International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# सिद्धार्थ भगतांच्या शेतकरी जीवन आणि समस्या मांडणाऱ्या गझलांचा अभ्यास

**नानकसिंग अमरसिंग साबळे**
*संशोधक विद्यार्थी,*
*तक्षशिला महाविद्यालय, अमरावती*
*Corresponding Author – नानकसिंग अमरसिंग साबळे*
**DOI - 10.5281/zenodo.15240837**

***सारांश :***

*सिध्दार्थ भगत यांच्या गझलांतून शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे कष्ट आणि व्यवस्थेतील अन्यायाचे वास्तववादी चित्रण होते. कर्जबाजारीपणा, आत्महत्या, अवकाळी पाऊस, हमीभावाचा अभाव आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक त्यांच्या लेखणीत प्रभावीपणे दिसते. त्यांच्या गझलांमध्ये हतबलतेपेक्षा संघर्षाची चेतना आणि व्यवस्थेविरोधातील बंडखोरीचा स्वर आहे. त्यामुळे त्यांच्या गझलांचा अभ्यास साहित्यिक सौंदर्याच्या चौकटीत न राहता, तो सामाजिक आणि आर्थिक वास्तावाचा दस्तऐवज म्हणून केला जावा.*

***बीजशब्द : शेतकरी संघर्ष, ग्रामीण व्यथा, शोषण आणि व्यवस्थेचा अन्याय, कर्जबाजारीपणा, आत्महत्या आणि हतबलता, ऊसतोड मजूर जीवन, निसर्गाच्या लहरी, बाजारभाव अन्याय, प्रशासनाची उदासिनता, परिवर्तनाची आस.***

**प्रस्तावना** :

साहित्य समाजाचा आरसा असतो आणि त्यातून माणसाचे दु:ख, वेदना, आनंद, आशा-निराशा यांचे प्रतिबिंब उमटत असते. मराठी गझलही याला अपवाद नाही. पारंपरिक गझल प्रेम विरह आणि व्यक्तिगत भावनांच्या चौकटीत असली तरी आधुनिक मराठी गझलने सामाजिक आशय आत्मसात केला आहे. विशेषत: ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांच्या व्यथा, त्यांच्या संघर्षाची चिरफाड आणि त्यामागील व्यवस्थेचे विच्छेदन करण्याचे काम अनेक गझलकारांनी केले आहे. याच परंपरेत सिध्दार्थ भगत यांची गझल ठळकपणे समोर येते.

सिध्दार्थ भगत हे शेतकऱ्यांचे दु:ख, त्यांच्या संघर्षाची दाहकता, व्यथित करणाऱ्या परिस्थितीचे वर्णन आणि व्यवस्थेचे भेदक विश्लेषण आपल्या गझलांमधून प्रभावीपणे मांडतात. त्यांच्या गझलांचा बाज अत्यंत सखोल सामाजिक जाणिवेचा आहे. शेतकरी आत्महत्या, कर्जबाजारीपणा, बाजारभावातील अन्याय, निसर्गाचा लहरीपणा, प्रशासनाची बेफिकिरी आणि ग्रामसंस्कृतीतील बदल यांसारख्या मुद्यांना ते धारदार शब्दांनी स्पर्श करतात. त्यांच्या गझलांमध्ये केवळ वेदना नाहीत, तर शोषणाच्या विरोधातील एक संघर्षशील आवाजही आहे. त्यांच्या काव्यात ग्रामीण संस्कृतीचे जिवंत चित्रण असते. ऊसतोड मजुरांचे हाल, पावसाच्या अवेळी लहरींनी उध्वस्त झालेल्या पिकांचे विदारक दृश्य, शेतकरी आंदोलनातील आक्रोश आणि व्यवस्थेच्या विरोधातील आक्रोश हे त्यांच्या गझलांमधून प्रभावीपणे व्यक्त होते. त्यांच्या शायरीमध्ये कधी विद्रोह आहे, तर कधी परिवर्तनाची आस आहे.

शेतकऱ्यांचे जीवन हे केवळ त्यांच्या कष्टांनी मोजले जाणारे नाही, तर त्यातील असहायता, परावलंबित्व आणि शासन-व्यवस्थेच्या दडपशाहीतून

निर्माण होणारे संकटदेखील महत्वाचे आहे. सिध्दार्थ भगत यांच्या गझलांतून हा प्रश्न फक्त वेदनादायी पध्दतीने मांडला जात नाही, तर त्याला एक राजकीय आणि सामाजिक संदर्भही मिळतो, हे त्यांच्या गझलांचे मोठे वैशिष्ट्य म्हणता येईल.

सिध्दार्थ भगत यांनी शेतकरी जीवन आणि त्यांच्या समस्यांवर आधारित गझलांचा अभ्यास करतांना केवळ शेतकऱ्यांच्या वेदनांचे चित्रण करण्यापेक्षा त्या समस्यांची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पार्श्वभूमी तपासण्याची गरज आहे.

**सिद्धार्थ भगत यांचा परिचय :**

सिद्धार्थ भगत यांचा जन्म 2 सप्टेंबर 1965 रोजी यवतमाळ जिल्ह्यातील, बाभुळगाव तालुक्यातील राणी अमरावती येथे झाला. सिद्धार्थ भगत यांचा जन्म एका गरीब दलित कुटुंबात झाला. शिक्षणाची गोडी असूनही त्यांना बालपणात अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यांचे शिक्षण शासकीय शाळेत झाले. परिस्थिती विरहीत असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण करण्याची जिद्द कायम ठेवली. सिद्धार्थ भगत हे आधुनिक मराठी साहित्यामधील एक महत्त्वाचे गझलकार आहेत. ग्रामीण जीवनातील संघर्ष, शोषितांचे दु:ख आणि आत्मसन्मान या आधारित गझल लेखन त्यांनी केले आहे. सिद्धार्थ भगत यांची प्रकाशित पुस्तके युद्धयात्रा, अस्वस्थ मनाच्या नोंदी, यापुढे माझी लढाई, आणि पुन्हा एकदा बुद्ध हसावा म्हणून !, वर्तुळकंसातील अवतरणे, कळ कोवळी उठू दे, इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. विविध क्षेत्रामध्ये राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

**शेतकरी जीवनाची संकल्पना :**

शेतकरी जीवन आणि त्याच्या समस्या मांडणाऱ्या गझलांचा अभ्यास म्हणजे कृषि संस्कृतीतील संघर्ष, वेदना आणि प्रतिकुलतेच्या छायेत उभ्या असलेल्या शेतकऱ्याच्या भावविश्वाचे काव्यात्मक दस्तऐवजीकरण होय. या गझला केवळ व्यक्तिगत व्यथा मांडत नाहीत, तर त्या सामाजिक अन्याय, आर्थिक शोषण, निसर्गाच्या अनियमितता आणि व्यवस्थेच्या उदासीनतेवर भाष्य करतात. शेतकऱ्याच्या घामातून उमलणारी हतबलता, आशा-निराशेचा खेळ, आत्महत्येची टोकाची अवस्था आणि शेतीतील अस्थिरता यांचे जीवंत चित्रण या गझलांमध्ये दिसते. त्यामुळे केवळ दु:खाचे चित्रण नसते, तर व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे सामर्थ्यही असते. गझल शेतकऱ्याच्या वेदनेचा आवाज बनून सामाजिक परिवर्तनाची मागणी करतो.

**शेतकरी जीवन आणि समस्या :**

शेतकरी हा समाजाचा आधारस्तंभ असूनही त्याच्या आयुष्याला संघर्षाचा एक अखंड प्रवाह जखडून ठेवतो. शेती हे फक्त व्यवसाय नसून ती शेतकऱ्याच्या अस्तित्वाचा एक भाग आहे. मातीशी असलेली त्याची नाळ ही केवळ आर्थिक संबंधाची नसून भावनिक आणि सांस्कृतिक गुंतवणूकीची आहे. परंतु हीच शेती त्याला कित्येकदा अडचणीत आणते. कारण ती संपूर्णत: निसर्गाच्या लहरींवर आणि व्यवस्थेच्या अनागोंदीवर अवलंबून असते.

सिध्दार्थ भगतांच्या गझला जीवनाची हृदय पिळवटून टाकणारी कहाणी सांगतात. त्यातील प्रत्येक शेर हा त्यांच्या संघर्षाचा एक वेगळा पैलू उलगडतो. निसर्गाचा अनिश्चितपणा, शेतीतील अपयश, आर्थिक संकटे आणि आत्महत्येचे भीषण वास्तव प्रामुख्याने आपणास आढळून येते.

भारतीय शेतकरी प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून असतो. पाऊस वेळेवर आणि योग्य प्रमाणात आला तरच त्याचे पीक जोमाने येते. पण हवामान बदलामुळे कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, तर कधी गारपीट त्यांच्या कष्टांवर पाणी फिरते. उदा. -

**“मेघांनी व्यापिले नभ तरी पाऊस का दूर हा**
**पाण्यावीन पूर उदास नयनी दाटे कसा पुर हा.”**

**"मातीला नव्हताच गंध सुटला पाऊस आला कुठे**
**देहाचा जळला असेल कुठल्या गंधाळ कापूर हा"**

……… (युद्धयात्रा, पृ. 35)

**"जमीनीला तडे गेले नसे आभाळही ओले**
**दिसेनाशा जणू झाल्या मृगाच्याही सरी त्यांना."**

……… (युद्धयात्रा, पृ. 86)

**"मातीत राबूनही ज्यांच्या उपाशी पिढ्या**
**मेलेत जे कैकदा आता मरावे कसे"**

……… (युद्धयात्रा, पृ. 26)

या शेरांमध्ये अपेक्षाभंगाचा मोठा अर्थ दडलेला आहे. आभाळ ढगांनी भरले तरी पाऊस पडत नाही, हा अनुभव शेतकऱ्याच्या आयुष्यात वारंवार येणारा आहे. ही परिस्थिती म्हणजे मृगजळासारखी, जसे की शेतकऱ्याला वाटते की आता त्याचे सुख येईल, पण शेवटी हाती काही लागत नाही. पाऊस आला तरी तो वेळेवर येत नाही किंवा त्याचा योग्य परिणामही होत नाही. जमिनीत ओलावा नाही, मृगाच्या सरी हरवल्यासारख्या झाल्या आहेत. यामध्ये बदलत्या हवामानाचे संकट आणि शेतकऱ्याच्या हतबलतेचे प्रतिबिंब आहे. शेतकरी पिढ्यान् पिढ्या मेहनत करूनही उपाशीच राहतात. अनेक शेतकरी हलाखीच्या परिस्थितीत जमीन गमावतात. अशा परिस्थितीत आता जगायचे तरी कसे, हा प्रश्न त्यांच्या वेदनांची तीव्रता दाखवतो.

सिध्दार्थ भगत त्यांच्या शेरमध्ये सांगतात की, शेतकरी वर्षभर राबतो, पण त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला त्याला मिळत नाही. मध्यस्थ, बाजारातील अस्थिरता आणि सरकारची निष्क्रियता यामुळे त्याच्या कष्टाचे चीज होत नाही. गझलमध्ये ते म्हणतात -

**"शेतमातीमध्ये ओतला जीव मी**
**राहिली फक्त ही शेवटी फणकटे"**

……… (युद्धयात्रा, पृ. 43)

इथे 'फणकटे' हा शब्द शेतकऱ्याच्या रिकाम्या हातांचे प्रतीक आहे. त्याने सर्व काही शेतासाठी अर्पण केले, पण शेवटी काहीच हाती नाही, असा याचा अर्थ होतो.

**"तापल्या तव्यावरी हात फार भाजले**
**मात्र दूरडीत का एकही न भाकरी"**

……… (युद्धयात्रा, पृ. 27)

ही गझल शेतकऱ्याच्या दैनंदिन आयुष्याचे वास्तव माडते. ज्या हातांनी लाखो लोकांसाठी अन्न पिकवले ते हात मात्र रिकामे आहेत.

शेतीत सतत होणारे आर्थिक नुकसान, कर्जाचा बोजा आणि त्यातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नसल्याने अनेक शेतकरी आत्महत्या करतात. उदा. -

**"रक्त, अश्रू, घाम सारे आटले**
**देह टाकावा आता शेतात का"**

……… (यापुढे माझी लढाई, पृ. 72)

या शब्दांमध्ये शेतकऱ्याचे अंतिम टोकाचे दुःख व्यक्त होते. त्याचा घाम, रक्त आणि अश्रू सर्व काही या मातीत मिसळले, पण त्याला न्याय मिळाला नाही. त्यामुळे आत्महत्या हा त्याच्यासाठी शेवटचा पर्याय उरतो.

सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. बँका मोठ्या उद्योगपतींची कर्जे माफ करतात, पण गरीब शेतकऱ्याच्या नावावर मात्र जप्ती येते. उदा. -

**"काळ सोन्याचा पुढे येईल ही**
**आजचे बोला, उद्याची बात कां"**

……… (यापुढे माझी लढाई, पृ. 72)

'काळ सोन्याचा' म्हणजे चांगले दिवस येतील असे सरकार सांगते, पण शेतकऱ्याचे वर्तमान मात्र अत्यंत भयावह आहे.

**"भरघोस पीक माझ्या दिसते जरी शिवारी**
**नजरेत मात्र त्यांच्या बघ टोळधाड आहे."**

……… (यापुढे माझी लढाई, पृ. 57)

पीक चांगले आले तरी निसर्ग किंवा बाजारव्यवस्था त्याचे नुकसान करून टाकते.

सिध्दार्थ भगतांची भूमिका केवळ काव्यरूपाने दु:ख व्यक्त करण्यापुरती मर्यादित नाही. त्या समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याचे काम करतात. शेतकरी जीवन मांडणाऱ्या गझलांमध्ये केवळ व्यथा नाही तर समाजाला विचार करण्यास भाग पाडणारा संदेश आहे. ही काव्यरचना नुसते करूणा निर्माण करत नाही, तर शेतकऱ्याच्या जगण्याच्या मुलभूत प्रश्नांकडे लक्ष वेधते.

**समारोप :**

या गझलांमधून शेतकऱ्यांच्या आयुष्यातील कठोर वास्तव समोर येते. निसर्गाच्या अनिश्चिततेने आणि दुष्काळासारख्या परिस्थितींशी शेतकऱ्यांचे जीवन संकटमय झाले आहे. कष्ट करूनही त्यांच्या हाताला अपेक्षित फळ मिळत नाही. उपासमारीची वेळ येते आणि शेवटी निराशेच्या गर्तेत ते हरवून जातात. शेतीत ओतलेला जीव निष्फळ ठरल्यासारखा वाटतो आणि शेवटी हा संघर्ष थांबवण्यासाठी शेतकरी टोकाचे निर्णय घेण्यास प्रवृत्त होतो. सिध्दार्थ भगतांनी ग्रामीण जीवनातील दु:ख, असहाय्यता आणि वेदना प्रभावीपणे मांडल्या आहेत.

**निष्कर्ष :**

1) शेतकरी वारंवार पावसाच्या लहरीपणाला तोंड देतात. आभाळ भरून येते, पण पाऊस मात्र लांबतो आणि शेती कोरडीच राहते.
2) मेहनत करूनही जमिनीतून अपेक्षित उत्पादन मिळत नाही. त्यामुळे कष्टाचा मोबदला मिळत नाही आणि शेतकरी अडचणीत सापडतात.
3) दिवसभर शेतात कष्ट करूनही कुटुंब उपाशी राहते. त्यांच्या घरात अन्न-धान्याची कमतरता असते आणि मुलभूत गरजाही पूर्ण होत नाही.
4) सततच्या संकटांमुळे शेतकरी तणावाखाली जगतो. श्रम, नैराश्य आणि अपेक्षाभंग यामुळे तो हताश होतो.
5) अखेरच्या टप्प्यावर शेतकरी पूर्णपणे निराश होतो आणि आत्महत्येकडे वळतो. त्याची परिस्थिती इतकी बिकट असते की जगणे त्याला असह्य वाटते.

**संदर्भ ग्रंथ :**

1) सिद्धार्थ भगत - 'युद्धयात्रा', निनाद प्रकाशन, यवतमाळ, द्वितीय आवृत्ती 2013.
2) सिद्धार्थ भगत - 'यापुढे माझी लढाई', निनाद प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती 2009.
3) सिद्धार्थ भगत - 'वर्तुळ कंसातील अवतरणे', निनाद प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती 2013.
4) सिद्धार्थ भगत - 'आणि पुन्हा एकदा बुध्द हसावा म्हणून !', निनाद प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती 2012.
5) सिद्धार्थ भगत - 'कळ कोवळी उठू दे', निनाद प्रकाशन, यवतमाळ, 2016.
6) सिद्धार्थ भगत - 'अस्वस्थ मनाच्या नोंदी', निनाद प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती 2014.
7) डॉ. युवराज मानकर - 'गझलप्रत्यय', देवयानी प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती 2019.
8) डॉ. संजय पोहरे - 'सुरेश भटांनंतर विदर्भातील मराठी गझल', स्वयं प्रकाशन, पूणे, पहिली आवृत्ती 2024.